# प्रकरण अकरा

# उपसंहार

# प्रकरण अकरावे

## अुपसंहार

प्रबंधाच्या दहा प्रकरणातील विवेचनाचा सारांश व त्यातून जाणवलेले निष्कर्ष सादर करणे, हा या शेवटच्या प्रकरणाचा अुद्देश आहे.

१८६५ ते १९३५ या कालखंडातील नाट्यसमीक्षेचा चिकित्सक अभ्यास, हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय आहे. डॉ.रा.शं.वाळिंबे यांचा, १९६६ सालचा "मराठी नाट्यसमीक्षा" हा ग्रंथ प्रस्तुत प्रबंधाचे काम हाती घेण्यापूर्वी प्रकाशित झालेला आहे. त्यात 'रंगभूमी', 'रत्नाकर' यासारख्या मोजक्याच नियतकालिकांचा अुपयोग केला आहे. सदर प्रबंधात मात्र १८६५ ते १९३५ या काळातील अुपलब्ध असलेली जवळ जवळ ४० नियतकालिके न्याहाळून त्या सर्वांतील नाट्यसमीक्षा ध्यानी घेतली आहे. स्वाभाविकच अुपलब्ध तपशिलात त्यामुळे भिन्नता निर्माण होणे अटळ होते. शिवाय मांडणी व व्यवस्थापन यांच्या संदर्भातही डॉ.वाळिंबे यांच्या ग्रंथापेक्षा वेगळेपणा साधला आहे. दुसरीही नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रस्तुत प्रबंधकार्य सुरू असतानाच प्रा.चंद्रकांत घांडे यांचा "मराठी नाट्यसमीक्षेचा विकास" हा ग्रंथही प्रकाशित झाला. (त्यावर प्रकाशनवर्ष ~~दिलेले नाही~~ १९७८.) विषयाच्या शेकरूपतेमुळे तोही ध्यानी घेणे क्रमप्राप्त ठरले. सदर प्रबंधातील लेखनात पुढील बाबतीत वेगळेपणा जाणवेल.

१. समीक्षाविषयक तात्त्विक विवेचन व नाट्यसमीक्षेचे व्यवच्छेदकत्व.

२. प्रा.घाडे यांच्या ग्रंथात समाविष्ट नसलेल्या जितर नाटककारांच्या नाटकांची समीक्षा.

३. दृश्यरूपसंबध्द समीक्षा.

सदर प्रबंधात १८९५ ते १९३५ या कालखंडातील अण्णासाहेब किर्लोस्कर, गो.ब.देवल, श्री.कृ.कोल्हटकर, कृ.प्र.खाडिलकर, रा.ग.गडकरी, मा.वि. वरेरकर हे महत्वाचे नाटककार व न.चिं.केळकर, वीर वामनराव जोशी जित्यादी जितरही नाटककार या सर्वांची सुमारे ९५ नाटके या ठिकाणी विचारात घेतली आहेत. अर्थातच या कालखंडातील नाट्यसमीक्षा अभ्यासण्यासाठी ही सर्व नाटके प्रथम वाचणे आवश्यक ठरलेच. आरंभी या प्रबंधात नियतकालिकांतर्गत समीक्षेचाच विचार करण्याचा हेतु होता. परंतु प्रत्यक्ष अभ्यास करीत असताना ग्रंथगत समीक्षाही विचारात घेणे आवश्यक असल्याचे जाणवले. दोन्ही ठिकाणी चर्चाविषय समान असणे स्वाभाविकच असले तरी दोन्हींमधील लेखनाच्या लक्षणीय अशा स्वरूपभेदामुळे दोन स्वतंत्र विभागात त्या समीक्षेचे विवेचन सादर केले आहे.

"नाट्यकथावली", "नाट्यकथामाला", "नाट्यकला", "रंगभूमि" जित्यादी सुमारे १२ नियतकालिके केवळ नाट्यविषयाला वाहिलेली आढळली. मात्र त्यापैकी "नाट्यकला" व "रंगभूमी" यातूनच समीक्षास्वरूपाचे लेखन प्रसिध्द झाले असून जितरांमधून केवळ नाटके वा नाटकांची कथानके दिली गेली आहेत. "नाट्यकला"चे फारच थोडे अंक अुपलब्ध झाल्यामुळे त्यासंबंधीचा विचार व बाकीच्या नाट्यविषयाला वाहिलेल्या नियतकालिकांची माहिती परिशिष्ट १ मध्ये दिली आहे. तर "रंगभूमी"तून आलेले लेख विषयानुसार त्या त्या प्रकरणात विचारात घेतले आहेत. यानंतर "ज्ञानप्रकाश", "विविधज्ञानविस्तार", "प्रतिभा", "रत्नाकर" अशा सुमारे ४० नियतकालिकांचे बांधीव खंड प्रत्यक्ष पाहिले. त्यातील नाट्यसमीक्षालेख विचारात घेतले. सुमारे २५० नाट्यसमीक्षालेख आढळले. विषयवार वर्गीकरण करून त्यासंबंधीचे विवेचन प्रबंधात सादर केले आहे. त्याचप्रमाणे या कालखंडात नाट्यसमीक्षा करणारी जी पुस्तके प्रसिध्द झाली, त्यांच्याबद्दलचे विवेचनही विषयवार वर्गीकरण करून येथे केले आहे.

नाट्यसमीक्षा हा समीक्षेचाच ओक खास प्रकार असल्याने सर्वप्रथम प्रकरण ओकमध्ये समीक्षेचे स्वरूप व तिच्या निरनिराळ्या पध्दती विचारात घेतल्या. त्यानंतरच्या प्रकरणांतील विषयवार विवेचन पुढीलप्रमाणे :-

१. <u>सैध्दान्तिक स्वरूपाची समीक्षा</u> :

या प्रकारच्या नियतकालिकांतर्गत लेखांमधून, नाट्याची अुत्पत्ति, नाटकाची घटना, नाट्यसृष्टीतील स्थित्यंतरे, नाट्यकलेच्या अवनतीची मीमांसा नाट्यरचनातंत्र, नाट्यपरीक्षणस्वरूप, ओकान्त नाटक या विषयांसंबंधी विवेचन आले आहे. तर या प्रकारच्या ग्रंथगत समीक्षेत भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचे सरळ भाषांतर, तसेच गोदावरी केतकर यांनी रस, नाटकांचे प्रकार, अंक, गर्भांक, पताकास्थानक, वृत्ती, लास्यांगे अित्यादी नाट्यशास्त्रातील तांत्रिक बाबींचे विस्तृत प्रमाणात स्पष्टीकरणासह मौलिक विवेचन केले आहे. नाट्याच्या अभ्यासकाला ते अत्यंत अुपयुक्त ठरणारे आहे. याशिवाय "रूपकप्रबोध" "नाट्यबोध" अशा पुस्तकांतूनही संस्कृतमधील नाट्यविचाराचा परिचय घडतो. गो.वा.बापट यांच्या पुस्तकात नाट्यशास्त्रातील मूलतत्त्वांचा व मुख्य सिध्दान्तांचा व्यापक विचार आढळतो. तर "नाट्यविषयाची सुनिश्चित चर्चा" यात नाटकासंबंधी निरनिराळ्या व्यक्तींनी मांडलेले विचार ओकत्रित स्वरूपात आढळतात. प्रकरण दोन व सहा यातून या विवेचनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

२. <u>नाट्यपरीक्षणे व नाटककारांचे मूल्यमापन</u> :

नियतकालिकांतर्गत समीक्षेचा बहुतांश भाग नाट्यपरीक्षणांनी व्यापलेला आहे. प्रारंभीची नाटके भाषांतरित व रूपांतरित असल्याने त्यांची परीक्षणे करताना भाषांतर व रूपांतर यासंबंधी बऱ्याच मोठ्या प्रमाणात व वारंवार चर्चा झालेली दिसते. कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी यांच्या नाटकांवर अनेक परीक्षणलेख आले आहेत. त्यातही महत्त्वाच्या वा लोकप्रिय नाटकांवर अधिक लेख आढळतात तर काही नाटकांकडे समीक्षकांचे दुर्लक्ष झालेले दिसते. अर्थात् यातून त्या त्या नाटकाच्या प्रकर्षाचा व लोकप्रियतेचा अंदाज घ्यायला येतो. ओकेका नाटककाराच्या समग्र वाङ्मयाचे विवेचन करणारे लेखही

नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले दिसतात. या लेखांतून त्या त्या नाटक-कारांचे संपूर्ण वाङ्मयीन चित्र रेखाटण्याचा प्रयत्न झालेला असतो. मात्र असे लेख तुलनेने खूप कमी प्रमाणात आढळतात.

ग्रंथगत समीक्षेच्या बाबतीत नेमका याउलट प्रकार आढळतो. "भावबंधन", "गुप्तमंजूष","द्रौपदी" व "मेनका" या नाटकांवरील परीक्षणा-त्मक अशी फक्त चारच पुस्तके लिहिली गेली असून नाटककारांच्या समग्र कृतींचे समालोचन करणारे आठ ग्रंथ (किर्लोस्करांबद्दल अेक, देवलांविषयी अेक, खाडिलकरांवर दोन, गडकऱ्यांबद्दल तीन व केळकरांबद्दल अेक) या काळात लिहिले गेले आहेत. वि.स.खांडेकर, वि.पां.दांडेकर, वा.ह.धारपुरे, श्री.ना.सहस्रबुद्धे असे साक्षेपी अभ्यासक, यांनी ते लिहिले आहेत. त्यांतील काही ग्रंथांतून नाटककारांच्या नाटकांचे नाटकशः, तर अितर काही ग्रंथांतून संविधानक, व्यक्तिचित्रण, विनोद, भाषा, पदे अशा विषयांनुसार समालोचन केलेले दिसते. वीर वामनराव जोशी, य.ना.टिपणीस, वासुदेवशास्त्री खरे, वि.ह.औंधकर, मा.वि.वरेरकर अित्यादी नाटककारांबद्दल ग्रंथस्वरूपी समीक्षा या कालखंडात अजिबात आढळत नसली तरी नियतकालिकांतून या सर्वांच्या नाटकांची अुल्लेखनीय प्रमाणात नोंद घेतलेली आहे. स्वाभाविकच या अशा नाटककारांवरील नाट्यसमीक्षेसाठी नियतकालिकांकडेच वळणे आवश्यक ठरते. प्रकरण तीन, चार, आठ व नअू यांतून याबद्दल विवेचन केले आहे.

३. <u>प्रयोगसंबद्ध (दृश्यरूपसंबद्ध) समीक्षा</u> :

रंगभूमीवर काम करणाऱ्या नटांच्या संवादातून आणि अभिनयातून अेका विशिष्ट कालमर्यादेत प्रेक्षक-श्रोत्यांसमोर नाटक साकार होत असते. त्याच्या अशा स्वरूपाच्या वेगळेपणामुळे साहित्यिक व प्रयोगसंबद्ध समीक्षा असे द्विविधत्व नाट्यसमीक्षेला प्राप्त होत असते. हे खरे असले तरी १८६५ ते १९३५ या कालखंडातील नाट्यपरीक्षणांतून प्रामुख्याने नाटकांच्या साहित्यिक गुण वा दोषांबद्दल विवेचन येत असून प्रयोगसंबद्ध विवेचनाची बोळवण शेवटच्या अेक-दोन वाक्यांत केली जाते. मात्र नट, त्यांचे समाजातील स्थान, नाट्य-शिक्षणाची आवश्यकता, अभिनय, संगीत, स्त्रीभूमिकांचे सादरीकरण अशा

रंगभूमीशी निगडित असलेल्या विषयावर नियतकालिकांतून स्वतंत्रपणे काही लेख आलेले आढळतात. तसेच त्याविषयीचे लेखन काही पुस्तकांतून आढळते. काही वेळा प्रेक्षकांनी आपली मते पत्रे पाठवून कळविलेली आढळतात. नटविद्येचा अभ्यासक्रम व नाट्यशिक्षणपध्दती याबद्दलचे विवेचन ही या समीक्षेतील लक्षणीय बाब म्हणावी लागेल. नेपथ्यापैकी देखावे, रंगभूषा, वेषभूषा यांचाही या लेखांमधून विचार झाला आहे. ग्रंथगत समीक्षेत नटाने आपली अभिनयकला कशी वाढवावी याबद्दलचे पुस्तक विशेष लक्षणीय होय. नटाचे सामाजिक स्थान गडकऱ्यांच्या पुस्तकात स्पष्ट केले आहे. नाटकाच्या प्रेक्षकांबद्दल ग्रंथगत समीक्षेत जास्त प्रमाणात विवेचन आढळते.

नियतकालिकांतून नाटकातील संगीत व स्त्रीभूमिकांचे सादरीकरण या प्रश्नांवर प्रदीर्घपणे चर्चा झालेली आहे. त्याबरोबरच "कुलीन स्त्रिया व रंगभूमी" या विषयावर चार पुस्तिका या कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत. नियतकालिके वा ग्रंथ या दोन्ही ठिकाणी या प्रश्नाकडे सामाजिक नीतिमत्तेच्या संदर्भातच पाहिले गेले आहे. आणि स्त्रियांनी नाटकात काम करणे अहितकारक असल्याचे ठामपणे सांगितले गेले आहे. आज हा विचार ऐतिहासिक दृष्ट्याच फक्त महत्त्वाचा असला तरी त्या काळात विचारवंतांना या प्रश्नाने किती अस्वस्थ बनविले होते, हे यामधून ध्यानी येते. प्रयोगसंबध्द नाट्यसमीक्षा या विषयावरील लेख व पुस्तके या दोन्हीतून अर्थातच कालसापेक्षता जाणवते कारण त्या काळच्या रीती, सामाजिक प्रश्न इत्यादींना उद्देशून हे लेखन झाले आहे. प्रकरण पाच व दहा यातून याबद्दल विवेचन केले आहे.

४. नाट्यकलेचा ऐतिहासिक आढावा घेणारे लेख काही प्रमाणात नियत-कालिकांत आढळतात. ऐतिहासिक मागोवा घेणारी पुस्तके म्हणजे अ.वि. कुलकर्णी यांचे "मराठी रंगभूमी", कृ.आ.गुरुजी यांचे "नाटकाची स्थित्यंतरे", अ.रं.देशपांडे यांचे "नाट्यकला व नाट्यवाङ्मय". या पुस्तकांमधून प्रामुख्याने नाटकांच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घेताना नीतिमत्तेच्या दृष्टिकोनातूनच विचार झालेला आढळतो. तसेच "मराठी रंगभूमी" या पुस्तकात काही ठिकाणी प्रयोगसमीक्षा आढळते. हे सारे विवेचन प्रकरण दोन व सातमध्ये केले आहे.

## ११.१ नियतकालिकांतर्गत समीक्षेचे स्वरूप :

या प्रबंधाच्या अभ्यासातून ध्यानात येणारे नियतकालिकांतर्गत समीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे :-

अनेकविध नियतकालिकांतून हे लेखन झालेले असल्याने ही नाट्यसमीक्षा अत्यंत विखुरलेल्या स्वरूपात आहे. तसे असल्याने या समीक्षेचे विनासायास सम्यग्दर्शन घडणे अवघड आहे. ते कार्य करण्याचा अेक प्रामाणिक प्रयत्न या प्रबंधात केला आहे. त्यासाठी अेकत्रीकरण व व्यवस्थापन या दोन्ही गोष्टी आवश्यक ठरतात, तसेच अनेकांनी व तेही स्फुट स्वरूपाने लिहिले असल्याने या विवेचनाची विषयवार मांडणी क्रमप्राप्त ठरते. या कालखंडात सुमारे ९५ लेखकांनी नाट्यसमीक्षात्मक लेखन केलेले आढळते. हे लेख आपण त्यासंगी व्यक्ती-प्रमाणेच हौसेखातर लेखकांनीही लिहिलेले आहेत. त्यामुळेच काही लेख हे समर्थ आविष्कारस्वरूप तर काही लेख अगदी कुबडी स्वरूपाचे असल्याचेही आढळते. या कालखंडात अेकाच समीक्षकाने अनेक नाटकांवर समीक्षणे लिहिली. (श्री.कृ.कोल्हटकरांनी "तोतयाचे बंड, सौभद्र, विक्रमशशिकला" अित्यादी नाटकांवर) तर काही वेळा अेकाच नाटकावर विविध समीक्षकांनी टीका लिहिल्या. ("अेकच प्याला" नाटकावर ना.सी. फडके, म.म.नाडकर्णी, ग.ह.कुलकर्णी अित्यादी लेखकांनी) काही वेळा ही समीक्षा अेकांगी वाटते कारण नाटकाच्या संविधानकरचना, व्यक्तिचित्रण, भाषाशैली, नाटकातील स्थल, काल व कृती यांचे अैक्य यापैकी अेखाद दुसऱ्याच पैलूवर ती प्रकाश टाकते. काही लेखांमधून गुणदर्शनच अधिक प्रमाणात आढळते. या उलट काहींमधून दोषैक-दृष्टीचाच प्रत्यय येतो. साधक बाधक विचार करून गुण व दोष या दोन्हींचे यथार्थ दर्शन घडविणारे समीक्षालेखन हेच काळाच्या ओघात टिकून राहणारे ठरते. बहुतेक वेळा हे लेखन नाट्यसंहितेबद्दल चर्चा करणारे असेच आहे. प्रयोग-विषयक अंगाचा फारसा विचार त्यात केला गेलेला नाही. तसेच कलाबाह्य अशा सामाजिक, नैतिक मूल्यांवर आधारलेली अशी ही टीका आहे. त्यासंगी विचार-प्रकटनापेक्षा तात्कालिक प्रतिक्रिया अुमटविणे, असे या लेखनाचे स्वरूप आहे. अर्थातच नाटकातील संगीत, स्त्रीभूमिकांचे पुरुषांनी केलेले सादरीकरण अित्यादींबद्दलचे विवेचन हे या प्रतिक्रियास्वरूपाचे खास प्रतिनिधी म्हणता येतील.

अशा प्रकारच्या समीक्षेतूनच समकालीन विचारांचे वळण कळण्यास साहाय्यक ठरणारी समीक्षा निर्माण झाली. या कालखंडात सामाजिक दृष्टिकोनातून केलेली, तसेच नीतिदृष्ट्या विचार करून लिहिलेली अशीच समीक्षा प्रामुख्याने आढळते. रंगभूमीच्या अितिहासविषयक लेखांतून थोड्याफार प्रमाणात अैतिहासिक समीक्षेचा अवलंब झालेला आढळतो. तुलनात्मक समीक्षा आढळली आहे. त्यातही दोन प्रकार आढळतात. "मूकनायक", "विद्याहरण", "अेकच प्याला" अशा नाटकांची विषयसाम्यामुळे परस्परांशी तुलना केलेली आढळते, तर कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी अशा नाटककारांची परस्परांशी तुलना आढळते.

अेकंदर नाट्यसमीक्षेला अेकेकट्या स्वरूपात क्रमशःच साहाय्य करणारे असे या समीक्षा लेखांचे स्वरूप आहे. तसेच खास नाटक या विषयाला वाहिलेली नियतकालिके या काळात निर्माण झाली होती ही घटनाही समीक्षाक्षेत्रात निश्चितच महत्त्वाची ठरते.

११.२ <u>ग्रंथगत समीक्षेचे स्वरूप</u> :

नियतकालिकांतर्गत समीक्षेपेक्षा तुलनेने ग्रंथगत समीक्षेचे स्वरूप अधिक गंभीर दर्जाचे आहे. त्यातही आधी लेखस्वरूपात नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊन नंतर ग्रंथरूपात संकलित झालेली समीक्षा असा अेक प्रकार आढळतो. अुदाहरणार्थ: "नाटकविषयक व्यापक विचार", "नाटकाची स्थित्यंतरे" ही प्रथमतः "रंगभूमी"तून प्रसिद्ध झाली होती. नाटकांवरील विस्तृत, सखोल, तपशीलवार विविध नाट्यांगांच्या साहाय्याने साधलेली चर्चा, नाटककारांचे मूल्यमापन, तात्त्विक विवेचन, अुपहासगर्भ शैलीतून साधलेली समीक्षा, असे या ग्रंथगत समीक्षेचे विविध पैलू आढळतात. तपशीलवारपणा, व्यासंगपूर्णता, विविध दृष्टिकोनातून साधलेले लेखन हे या समीक्षेचे विशेष आहेत. भरताच्या नाट्यशास्त्राचा मराठीत अनुवाद, रंगभूमीचा अितिहास सांगणारी पुस्तके, नाटककारांची चरित्रे अित्यादी लेखन प्रत्यक्षात समीक्षास्वरूप नसले तरी त्यातूनही अंशतः समीक्षात्मक तपशील अुपलब्ध होतो म्हणून त्या पुस्तकांचा प्रबंधात परामर्श घेतला आहे. (केवळ चरित्र, आत्मचरित्र स्वरूपी ग्रंथांचा विचार

मात्र या प्रबंधात केलेला नाही.) भरताच्या नाट्यशास्त्रविषयक ग्रंथावरील गोदावरीबाई केतकर यांचा ग्रंथ मराठी नाट्यसमीक्षेची समर्थ जाण निर्माण होण्यास खूप साहाय्यक ठरतो. अनुवादस्वरूप असला तरी तात्त्विक समीक्षा-क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करणारा असा हा ग्रंथ आहे. मराठीच नव्हे तर इतर-ही भारतीय भाषांतील नाट्यसृष्टीचा नाट्यशास्त्राच्या या आद्य ग्रंथाशी ऋण-संबंध असल्याने वारसाधनाच्या स्वरूपाचा हा ग्रंथ निश्चितच खूप महत्त्वाचा ठरतो. काशीबा.मराठे यांचे "नाकल व नाटक याविषयी निबंध" (१८७२) हे पुस्तक, हा नाट्यसमीक्षेतील नाटक या वाङ्मयप्रकाराचे विवेचन करणारा ऐतिहासिक महत्त्वाचा लक्षणीय प्रयत्न होय. रंगभूमीची स्थित्यंतरे दर्शित करण्याच्या प्रयत्नांतून ऐतिहासिक समीक्षालेखन तसेच नाटककारांच्या तुलनेतून तौलनिक समीक्षा तुरळक प्रमाणात आढळते. वि.स.खांडेकरांचे "गडकरी (व्यक्ति आणि वाङ्मय)" किंवा गो.वा.बापटांचे "नाटकविषयक व्यापक विचार" तसेच भा.वि.कुलकर्णी यांचे "मराठी रंगभूमी" ही पुस्तके ग्रंथगत समीक्षेतील लक्षणीय प्रयत्न आहेत.

एकंदरीत, या काळातील नाट्यसमीक्षावाङ्मयाचा साकल्याने विचार करता, हेच दृष्टीस पडते की, ही समीक्षा विविधता, विपुलता व गुणवत्ता या विशेषांनी बऱ्यापैकी संपन्न आहे. नव्याजुन्याच्या समन्वयातून ही समीक्षा घडत होती व घडत असतानाच स्वतःचे रूप सिद्ध करीत होती. समीक्षेमुळे वाङ्मयनिर्मितीत अधिक संपन्नता आली पाहिजे आणि रसिकांची रसग्रहणाची शक्ती अधिक सूक्ष्म व प्रभावी झाली पाहिजे. ही जाण पूर्वीच्या समीक्षकांना होती. म्हणूनच त्यांचे प्रसादयुक्त लिखाण वाचताना आजही आनंद होतो. समीक्षेच्या प्रांतात आज निर्माण झालेली अधिकाधिक जटिलता व त्यामुळे जाणवणारी दुर्बोधता त्या काळात नसल्याने जुन्या समीक्षेतील काही भाग निर्विवाद सुंदर वाटतो.

मुख्य म्हणजेच पौराणिक नाटकाचा अवतार मराठीत जसा इंग्रजीविद्या-विभूषितांच्या हस्ते झाला होता, तसेच या नाटकाचे मूल्यमापनही इंग्रजी समीक्षेचा मार्ग अनुसरणाऱ्या टीकाकारांकडून होत होते. संविधानकरचना,

व्यक्तिचित्रण, संवाद, भाषाशैली, विनोद अशा निकषांवर नाट्यकृती पारखली जात होती, ती इंग्रजी समीक्षेच्या आधारेच. कृष्णशास्त्री, विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्री.कृ.कोल्हटकर, गो.वा.बापट, ना.म.पावगी, श.वा.वर्दे यांनी मराठीतील नाट्यसमीक्षात्मक वाङ्मयाचा पाया रचला. चिपळूणकरयुगातील नाट्यसमीक्षा ही वाङ्मयसापेक्ष विचार करणारी होती. कोल्हटकरांची समीक्षाही प्रामुख्याने साहित्यनिकषांवर आधारित असेच होती आणि तिने इंग्रजी समीक्षेचा आधारही सोडला नव्हता. पण नाटककाराने व मर्मज्ञ साहित्यिकाने केलेली ही समीक्षा असल्याने तिला सहज आगळेच परिमाण लाभले आहे. नाट्याविष्कारातील समृध्दतेबरोबर प्रयोगसमीक्षा हळूहळू मूळ धरू लागली.

कोणत्या नाटकाचा प्रयोगविचार आणि त्याच्याकडे साहित्य या दृष्टीने पाहिल्यामुळे उद्भवणारा विचार ही नाट्यसमीक्षेची दोन वेगवेगळी रूपे असतात. प्रयोगसंबध्द समीक्षाविचारात नट, अभिनय, संगीत, स्त्रीभूमिकांचे सादरीकरण, प्रेक्षक वगैरे घटकांचा अंतर्भाव झाला आहे.

या समीक्षेच्या संदर्भ अभ्यासातून तसेच पात्रांचे शील, संगीत, नट, स्त्रीपार्ट अशा वेगळ्या संदर्भातून जुन्या काळाची जाणीव होते व ते चित्र डोळ्यापुढे उभे राहते.

संदर्भ समीक्षेपैकी नियतकालिकांतर्गत समीक्षेचा व्याप ग्रंथगत समीक्षेपेक्षा मोठा आहे. त्यापैकी ह.ना.आपटे कृत "शशिकला-रत्नपाल" या नाटकाचे परीक्षण, श्री.कृ.कोल्हटकरलिखित "तोतयाचे बंड"वरील परीक्षण, त्र्यं.वि.पर्वते यांनी केलेली "विद्याहरण", "मूकनायक" व "एकच प्याला" यांची तौलनिक समीक्षा, वि.स.खांडेकर यांची "मा.मनोरंजन"मधून आलेली "कोल्हटकरांची नाटके" ही लेखमाला, व.शां.देसाई यांचे "रत्नाकर"मधून आलेले "देवलांची नाटके", "खाडिलकरांची नाटके", "गडकऱ्यांची नाटके" असे अभ्यासपूर्ण लेख ही या काळातील नाट्यसमीक्षेची अभ्यासकाला प्राप्त झालेली देणगी होय. असे म्हटल्यास ते अतिशयोक्त ठरू नये.

या काळातील समीक्षेचे स्वरूप तात्त्विक, शुपयोजित, परीक्षणात्मक, मूल्यमापनात्मक आणि प्रयोगसंबध्द असे पंचविध स्वरूपाचे होते.

प्रयोगत समीक्षेमध्ये का.ना.पटवर्धन यांचे "नाटक्याचे तारे" हे पुस्तक किंवा ठोसर-मराठे यांचे "नाट्यकलाकुठार गाजेवे वळीत" हे वेगळ्याच अंगाने निर्माण झालेले प्रयत्न होत.

शेवटी, समीक्षा म्हणजे कलाकृतीतील भावदृष्टीशी तादात्म्य पावल्या-वर निर्माण झालेले स्पंदनचित्र असते. ती वाचणाऱ्या वाचकाला त्या साहित्य-कृतींनी अधिक चांगली समज येते, त्याचा दृष्टिकोन तयार होऊ लागतो. समीक्षेचे या आलोचनेचे पर्यवसान कलेसंबंधीच्या जाणिवा सुस्पष्ट होण्यातच होत असते. समीक्षा ही साहित्याच्या अस्तित्वातूनच निर्माण होत असते पण त्याच-बरोबर ती स्वतःचे स्थानही निर्माण करीत असते. समीक्षावाङ्मयाच्या इति-हासाच्या दृष्टीनेही या काळातील समीक्षा वैशिष्ट्यपूर्ण व लक्षणीय आहे. ती विवेचक अभ्यासाला शुपयुक्त व आवश्यक ठरते.

या प्रबंधाच्या लेखनात "संकलन" हा भाग अधिक येथे अपरिहार्य होतो. अनेक समीक्षकांचे अनेक ठिकाणी विखुरलेले समीक्षालेखन संकलित स्वरूपात आणून विषयवारीने येथे मांडले आहे. हे जे "संदर्भकार्य" या प्रबंधामुळे घडले आहे, ते त्या त्या विषयाच्या अभ्यासकांना शुपयुक्त ठरू शकणारे आहे. कालसापेक्ष असे काही निराळे चित्र या समीक्षेमुळे निर्माण होते का हेही या प्रबंधात पाहिले आहे. ही या प्रबंधामुळे घडलेली कामगिरी म्हणावी लागेल. नाट्यसमीक्षेची समीक्षा असे स्वरूप या प्रबंधाला प्राप्त होण्यासाठी या काळातील सर्व नाटक-कारांच्या नाट्यकृतींच्या अधिक विश्लेषक अभ्यासाची जोड आवश्यक ठरते. प्रस्तुत संकलनात्मक अभ्यासातून निर्माण होणारा तो एक नवा धुमारा ठरावा, अशी शुमेद आहे.

०००